# १. सर्वात्मका शिवसुंदरा

**कुसुमाग्रज** –विष्णु वामन शिरवाडकर (१९१२–१९९९) : ज्ञानपीठ पारितोषिक विजेते प्रसिद्ध लेखक, कवी, नाटककार. 'जीवनलहरी', 'विशाखा', 'समिधा', 'स्वगत', 'हिमरेषा', 'वादळवेल', 'मारवा', 'किनारा' इत्यादी काव्यसंग्रह; 'वैजयंती', 'राजमुकुट', 'कौंतेय', 'नटसम्राट', 'वीज म्हणाली धरतीला', 'विदूषक' इत्यादी नाटके प्रसिद्ध.

परमेश्वरास वंदन करून अंधारातून उजेडाकडे नेण्याची, संकटाशी सामना करण्याची शक्ती, कवी प्रस्तुत गीतातून मागत आहेत.



**सर्वात्मका शिवसुंदरा स्वीकार या अभिवादना।**
**तिमिरातुनी तेजाकडे प्रभु आमुच्या ने जीवना।।**

**सुमनांत तू गगनात तू**
**ताऱ्यांमध्ये फुलतोस तू**
**सद्धर्म जे जगतामधे**
**सर्वांत त्या वसतोस तू**
**चोहीकडे रूपे तुझी जाणीव ही माझ्या मना।।**

**श्रमतोस तू शेतामधे**
**तू राबसी श्रमिकांसवे**
**जे रंजले वा गांजले**
**पुसतोस त्यांची आसवे**
**स्वार्थाविना सेवा जिथे तिथे तुझे पद पावना।।**

**न्यायार्थ जे लढती रणी**
**तलवार तू त्यांच्या करी**
**ध्येयार्थ जे तमि चालती**
**तू दीप त्यांच्या अंतरी**
**ज्ञानार्थ जे तपती मुनी होतोस त्यांची साधना।।**

**करुणाकरा करुणा तुझी**
**असता मला भय कोठले**
**मार्गावरी पुढती सदा**
**पाहीन मी तव पाउले**
**सृजनत्व या हृदयामध्ये नित जागवी भीतीविना।।**

प्रस्तुत गीत हे काव्यानंदासाठी घेतले असून, ते विद्यार्थ्यांकडून तालासुरात म्हणवून घ्यावे.